# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
## (रिलायन्स एनर्जी लिमिटेड यांना लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम,२००८

**विद्युत अधिनियम २००३**

क्रमांक- मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/आरईएल/२००८/१६६५:विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१च्या उप-कलम (२) मधील खंड (डी) सह कलम १६ चे परंतुक आणि कलम १७२ च्या खंड (बी) ने प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग खालील विनियम करीत आहे:-

**१. संक्षिप्त नांव, लागू करणे, व्याप्ती व प्रारंभ**

(१) या विनियमांना **"महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (रिलायन्स एनर्जी लिमिटेड यांना लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २००८"** असे म्हणावे.

(२) येथे नमूद केलेल्या अटी वगळता, विद्युत अधिनियम, २००३ ने रद्द केलेल्या कायद्यांखाली रिलायन्स एनर्जी लिमिटेड यांना पूर्वी देण्यात आलेला परवाना, मंजू-या किंवा मान्यता यांना हे विनियम अधिक्रमित करतील.

(३) हे विनियम रिलायन्स एनर्जी लिमिटेडच्या संपूर्ण वीज पुरवठ्याच्या क्षेत्राला लागू असतील.

(४) हे विनियम शासकीय राजपत्रात ज्या दिनांकास प्रसिध्द होतील त्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. व्याख्या:** या विनियमात, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर:-

(अ) "अधिनियम" म्हणजे वेळोवेळी अंमलात असलेला विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६);

(ब) "आरईएल" किंवा "वितरण परवानाधारक" म्हणजे रिलायन्स एनर्जी लिमिटेड (कंपनी निबंधक, महाराष्ट्र, मुंबई, यांनी दिनांक २८ एप्रिल, २००८ रोजी नावातील बदलामुळे दिलेल्या नवीन समावेशन प्रमाणपत्रानंतर रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड म्हणून आता ओळखली जाणारी).

(क) "सर्वसाधारण अटी" म्हणजे वेळोवेळी अंमलात असलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्वसाधारण अटी.

या विनियमात वापरलेल्या आणि ज्यांची व्याख्या करण्यात आलेली नाही अशा शब्द व उक्तींना अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम आणि विनियमांनुसार अर्थ राहील.

## ३. अर्थनिश्चिती

आरईएलच्या बाबतीतील या विशिष्ट अटी आणि आयोगाने अधिसूचित केल्याप्रमाणे परवान्याच्या सर्वसाधारण अटी, या आरईएलच्या परवान्याच्या अटी म्हणून मानण्यात येतील आणि या अटी येथे खाली विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रातील त्यांच्या विजेच्या पुरवठ्याचे आणि किरकोळ विक्रीच्या कार्याचे नियमन करतील.

## ४. पुरवठ्याचे क्षेत्र

४.१ "दि बॉम्बे सबर्बन इलेक्ट्रिक लायसन्स, १९२६" खाली वर्णन करण्यात आलेल्या संपूर्ण क्षेत्रात, सदर परवान्यात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अशा अटी आणि वगळण्यात आलेल्या बाबींना अधीन राहून, वितरण परवानाधारक वीज पुरवठा करण्यास प्राधिकृत राहील.

४.२ अधिनियमातील तरतुदींनुसार सर्व प्रयोजनांसाठी जनतेला वीज पुरवठा करण्यास वितरण परवानाधारक प्राधिकृत राहील.

## ५. परवान्याची मुदत

अधिनियमातील तरतुदींना अधीन राहून, दिनांक १५ ऑगस्ट, २०११ पर्यंत परवाना अंमलात राहील म्हणजेच अधिनियमानुसार जोपर्यंत आरईएल वितरण परवानाधारक असल्याचे मानण्यात येईल त्या उर्वरित कालावधीपर्यंत.

## ६. विशिष्ट अटी व परवान्याची पाहणी

या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकानंतर लगेच, वितरण परवानाधारक त्याच्या विशिष्ट अटी व परवाना, मंजू-या किंवा मान्यता जनतेला पाहणीकरिता उपलब्ध करुन देईल.

## ७. दुरुस्ती करण्याचे अधिकार

आयोगाला कोणत्याही वेळी, या विनियमातील कोणत्याही तरतूदीमध्ये बदल, फेर-फार, अल्प-बदल किंवा दुरुस्ती करता येतील. या विनियमात केलेले कोणतेही बदल त्यासंबधीच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून लागू राहतील आणि ते बदल त्यानंतर त्यांच्या बदल केलेल्या स्वरुपातच अंमलात राहतील किंवा राहणार नाहीत, जसे असेल तसे. तथापि, हे बदल अंमलात आणत असताना, या पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेला, अशा बदलामुळे किंवा रद्दीकरणामुळे, बाधा येणार नाही.

## ८. अडचणी दूर करण्याचे अधिकार

या विनियमातील तरतूदींची अंमलजावणी करताना कोणतीही अडचण आली तर आयोगाला सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाने, अधिनियमातील तरतूदींशी विसंगत नसतील अशा परंतु अडचण दूर करण्यासाठी आवश्यक अशा तरतुदी करता येतील.

प्र. बा. पाटील
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

मुंबई,
दिनांक २० ऑगस्ट, २००८